| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| MHNS160008602022 | दाखल दिनांक | :- | ०३/०८/२०२२ | | |
| | नोंदणी दिनांक | :- | ०३/०८/२०२२ | | |
| | न्यायनिर्णय दिनांक | :- | २७/०३/२०२६ | | |
| | **कालावधी** | **:-** | **वर्ष,** | **महिने,** | **दिवस** |
| | | | **०३** | **०७** | **२४** |

**चांदवड येथील न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी,न्यायालय क्रं. ०१ यांच्या न्यायालयात**

**(पीठासीन अधिकारी- एस. एस. छल्लाणी)**

(घोषीत दिनांक २७/०३/२०२६)

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.३६३/२०२२**

**निशाणी क्र.३२**

**गु.र.नं. ५७७/२०२१**

**पोलीस ठाणे चांदवड.**

| | |
|---|---|
| **अभियोग पक्ष** | **महाराष्ट्र शासन मार्फत,**<br>पोलीस ठाणे अधिकारी,<br>पो.स्टे. चांदवड, जि. नाशिक. |
| **अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता** | श्री. एन. पी. मोरे |
| **आरोपीचे नावे** | **परेश हिरामण आहीरे,**<br>वय:- २९ वर्ष, व्यवसाय :-<br>रा. गट क्र. १९४ पी. प्लॅट क्र. सी. ९०२ कमलराज सोसायटी बोराडेवाडी मोशी, पुणे, ४१२१०५, |
| **आरोपीतर्फे विधीज्ञ** | श्री. ए. आर. पठाण वकील, |

**भाग-ब**

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | ०२/११/२०२१ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | ०४/११/२०२१ |

CNR No.MHNS160008602022 संफौ.ख.क्र.३६३/२०२२ (न्यायनिणर्य)
सरकार विरुद्ध अशोक वाळके.

| | |
|---|---|
| दोषारोपत्र दाखल दिनांक | ०३/०८/२०२२ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | ०३/०८/२०२२ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | २५/०२/२०२६ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याचा दिनांक | निरंक |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | २७/०३/२०२६ |
| शिक्षा दिल्याची तारीख, आदेश | निर्दोष मुक्त. |

**आरोपीचा तपशील**

| | |
|---|---|
| आरोपीची श्रेणी | १ |
| आरोपीचे नाव | **परेश हिरामण आहीरे** |
| अटक तारीख | आरोपी यांना सी.आर.पी.सी. ४१ (अ)(१) नोटीस |
| जामीनवर सोडल्याची तारीख | ०३/०८/२०२२ |
| अधिनियम | भा.द.वि. १८६० चे कलम २७९, ३०४ (अ), ३३८ व मोटार वाहन कायदा कलम १८४ व १३४ (ब) १७७ अन्वये |
| निर्दोष मुक्त केले किंवा शिक्षा दिली. | निर्दोष मुक्त |
| दिलेली शिक्षा. | निरंक |
| सुनावणी दरम्यान जेलमध्ये असल्याचा कालावधी कलम ४२८ सीआर.पी. सी. | निरंक |

**भाग–क**

**अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यांदी/ बचाव/ न्यायालयाचे साक्षीदार**

**अ. अभियोग**

| **श्रेणी** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकिय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर** |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| | | साक्षीदार) |
| अ.सा.क्र.१ | दिपक तानाजी आहिरे | फिर्यादी (निशाणी क्र.२४) |

**ब. बचाव साक्षीदार, इतर**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकिय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| डि.सा.क्रं.१ | निरंक | निरंक |

**क. कोर्ट साक्षीदार, इतर**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकिय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| सी.सा.क्रं.१ | निरंक | निरंक |

**अभियोग पक्षाचे/ बचाव / कोर्ट निशाणी**

**अ. अभियोग**

| अनु.क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**ब. बचाव**

| अनु.क्र. | निशाणी क्रं. | तपशील |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**क. कोर्ट निशाणी**

| अनु.क्र. | निशाणी क्रं. | तपशील |
|---|---|---|
| १ | दोषारोप | निशाणी क्र.०८ |
| २ | ३१३(१)(ब) | निशाणी क्र.३० |

ड. मुद्देमाल

| अनु.क्र. | मुद्देमाल क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | – | निरंक |

## न्यायनिर्णय
## (घोषित दिनांक : २७/०३/२०२६)

**०१.** आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान,१८६० चे कलम २७९, ३०४ (अ), ३३८ व मोटार वाहन कायदा कलम १८४ व १३४ (ब) १७७ अन्वयेच्या दंडनीय अपराधाकरीता दोषारोप ठेवण्यात आले आहे.

## अभियोगपक्षाची हकीकत पुढीलप्रमाणे आहे.

**०२.** अभियोग पक्षाचे कथन असे आहे की, दि. ०२/११/२०२१ रोजी रात्री १३.०० वाजताच्या सुमारास मुंबई–आग्रा महामार्ग क्र. ३, चांदवड चौफूली येथे गुंजाळ पेट्रोलपंपासमोर रोडवर, चांदवड, ता. चांदवड येथे आरोपी याने याने त्याचे ताब्यातील फाइट कंपनीची ग्रांड पुंटो डायनामीक गाडी क्र. एम–एच– ०९–डी.एक्स–१३४४ ही मुंबई–आग्रा महामार्ग क्रमांक ०३ यावर नाशिक बाजुकडुन मालेगांव बाजुकडे भरधाव वेगात, हयगयीने, अविचाराने, रस्त्याचे परिस्थीतीकडे दुर्लक्ष करून चालवुन घेवुन जात असतांना चांदवड शहरातील चांदवड चौफुली जवळ गुंजाळ पेट्रोलपंपासमोर रोडवर नाशिक बाजुकडुन चांदवड बाजुकडे जाणारी ॲक्टीव्हा गाडी क्र. एम–एच–१५–डी.एन–२१५८ हीस पाठीमागुन जोराची ठोस मारून अपघात करून अपघातात ॲक्टीव्हा गाडीवरील महीला नामे संगीता आनंदा खडताळे रा. मंगरूळ ता. चांदवड जि. नाशिक हीचे गंभीर दुखापतीस व मरणांस तसेच दोन्ही वाहनांचे नुकसानीस कारणीभुत होवुन अपघाताची खबर न देता पळून गेला म्हणुन फिर्यादीने चांदवड पोलीस ठाणे येथे आरोपींविरुद्ध तक्रार दाखल केली.

०३. आरोपीविरुध्द अपराध क्र.५७७/२०२१ जो भारतीय दंड विधान, १८६० चे कलम २७९, ३०४ (अ), ३३७, ४२७ व मोटार वाहन कायदा कलम १८४ व १३४ (ब) नुसार नोंदविण्यात आला. तपासी अधिकारी श्री. एस. एच. शेख पो. उप. निरीक्षक यांनी दाखल गुन्हयाचा तपास केला. तपासा दरम्यान त्यांनी फिर्यादीचे व साक्षीदारांचे बयाण नोंदविले व दोषारोप पत्र दाखल केले.

०४. आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम २७९, ३०४ (अ), ३३८ व मोटार वाहन कायदा कलम १८४ व १३४ (ब) १७७ अन्वयेच्या दंडनीय अपराधाकरीता दोषारोप **निशाणी क्र.३०** प्रमाणे निश्चित केला. आरोपीने त्याचेविरुध्द ठेवण्यात आलेले आरोप नाकारुन सुनावणीची मागणी केली, म्हणुन संपरीक्षा पुढे चालविण्यात आली. आरोपीविरुध्द फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३(१)(ब) अन्वये अभिप्रेत असलेला आरोपीचा जबाब **निशाणी क्र. ३०** वर नोंदविण्यात आला आहे.

०५. माझ्या विचारार्थ निघालेले विचाराधीन प्रश्न व त्यावरील माझे निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे देत आहे :–

| अनु.क्र. | विचाराधीन प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने सिध्द केले का की, दिनांक ०२/११/२०२१ रोजी रात्री १३.०० वाजताच्या सुमारास मुंबई–आग्रा महामार्ग क्र. ३, चांदवड चौफूली येथे गुंजाळ पेट्रोलपंपासमोर रोडवर, चांदवड, ता. चांदवड येथे आरोपी याने त्याच्या ताब्यातील एम–एच– ०९–डी.एक्स–१३४४ च्या चालकाने भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून मानवी जिवीतास धोका निर्माण होईल अशा पध्दतीने फिर्यादीला | ...नाही. |

| | | |
|---|---|---|
| | जोऱ्यात धडक दिली ? | |
| २. | अभियोग पक्षाने सिध्द केले का की, उपरोक्त नमुद दिनांक, ठिकाणी व वेळी आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमुद वाहन हे भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवून संगीता आनंदा खडताळे यांचा मृत्यू घडवून आणला की ज्यामुळे मानवी जीवन धोक्यात येईल आणि ते दोषपूर्ण मनुष्यवध नाही ? | **...नाही.** |
| ३. | अभियोग पक्षाने सिध्द केले का की, उपरोक्त नमुद दिनांक, ठिकाणी व वेळी आरोपीने त्याच्या ताब्यातील उपरोक्त नमुद वाहन हे भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवून संगीता आनंदा खडताळे हिस गंभीर दुखापत पोहचवली ? | **...नाही.** |
| ४. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, वरील दिनांक, वेळ व ठिकाणी येथे आरोपीने गाडी क्र. एम–एच– ०९–डी.एक्स–१३४४ हे भरधाव वेगात निष्काळजीपणे रस्यावरील परिस्थितीचा विचार न करता चालविले ? | **...नाही.** |
| ५. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे काय की, वरील दिनांक, वेळ व ठिकाणी येथे आरोपीने त्याच्या ताब्यातील उपरोक्त नमुद वाहन हे सार्वजनिक रस्त्यावर इतक्या निष्काळजीपणे चालवले व मानवी जीव धोक्यात येईल, जखमींना जवळच्या वैद्यकीय दवाखान्यात न पोहोचवता तेथून पळून गेला ? | **...नाही.** |
| ६. | आदेश काय ? | **अंतीम आदेशानुसार.** |

## कारणमिमांसा

**०६.** आरोपीविरुध्द दोषारोप सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने एकमेव साक्षीदार तपासला तो म्हणजे फिर्यादी दिपक तानाजी आहिरे (अ.सा.क्र.१) यांना **निशाणी क्र.२४** वर तपासला आहे. अभियोग पक्षाचा साक्षीपुरावा **नि.क्र.०१** वरील आदेशावरुन बंद करण्यात आला.

**विचाराधिन प्रश्न क्र.१ ते ५ बाबत:–**

**०७.** विचाराधारीन प्रश्न क्र.१ ते ५ हे संलग्नीत असल्याने ते चर्चेकरीता एकत्रीत घेण्यात आले.

**०८.** अभियोग पक्षाने फिर्यादी साक्षीदार दिपक तानाजी आहिरे याला **निशाणी क्र.२४** वर तपासले परंतु त्यांनी अभियोगपक्षास सहकार्य केले नाही. त्यांनी त्यांच्या पुराव्यात कथन केले की, घटनेबाबत त्यांना काही आठवत नाही व त्यांना जवाब दाखवण्यात आला असता त्यांनी त्यातील मजकुर नाकारला व फक्त त्यावरील सही मान्य केले. पुढे त्यांनी दिनांक २३/०१/२०२३ त्यांचा अपघात झाला होता व त्याबाबत पोलिसांनी त्यांचा त्याबाबत जवाब नोंदवून घेतला होता व त्यावरुन फिर्याद नोंदवून घेतली होती याबाबी त्यांनी स्पष्टपणे नाकारल्या आहेत. सदर साक्षीदार हा अभियोगपक्षास सहकार्य करत नसल्याने त्याला सरकार पक्षाने उलटतपासात विचारण्यासारखे प्रश्न विचारुन आवश्यक तो पुरावा अभिलेखावर आणण्याचा प्रयत्न केला मात्र अभियोग पक्षाला त्यामध्ये यश आले नाही.

**०९.** अभियोग पक्षातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, तपासलेल्या साक्षीदारांच्या साक्षीवरुन आरोपीने गुन्हा केलेला आहे ही बाब निसंशयीतपणे शाबीत झालेली आहे. सदरील साक्षीदारांच्या साक्षेवर गैरविश्वास ठेवावा अशी कोणतीही बाब अभिलेखावर आलेली नाही, त्यामुळे आरोपीला कायद्याप्रमाणे शिक्षा करण्यात यावी.

त्याउलट आरोपीतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, प्रकरणातील फिर्यादीने अभियोगपक्षाला सहकार्य केले नाही. इतर कोणत्याही स्वतंत्र साक्षीदाराची साक्ष अभियोगपक्षाने नोंदवली नाही. घटनेला कोणीही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाही. आरोपी हा घटनेवेळी त्याचे वाहन हलगर्जी व निष्काळजीपणाने चालवित होता असा कोणताही पुरावा अभिलेखावर नसल्याने अभियोग पक्षाच्या प्रकरणावर संशय निर्माण होतो. त्याकारणाने आरोपीला प्रस्तुत गुन्हयातुन निर्दोष मुक्त करण्याची विनंती केली.

**१०.** आरोपीविरुध्द भा.द.वि. कलम २७९, ३०४ (अ), ३३८ व मोटार वाहन कायदा कलम १८४ व १३४ (ब) १७७ हे लावण्यात आलेले आहे. आरोपीने सार्वजनिक ठिकाणी त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवले व अपघात घडुन आणला व त्यात फिर्यादीची बहिण मयत झाली ही बाब सिध्द होणे आवश्यक आहे. थोडक्यात, खरोखरच आरोपी सार्वजनिक ठिकाणी त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवले व अपघात घडुन आणला ही बाब तपासणे आवश्यक आहे. सदर प्रकरणात फक्त फिर्यादीचीच साक्ष नोंदवण्यात आली आहे. जप्ती पंच साक्षीदार, घटनास्थळ पंच साक्षीदार, तपासी अधिकारी, वैद्यकीय अधिकारी व इतर प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांची साक्ष अभियोगपक्षाला तपासण्यात अपयश आले आहे. घटनेला कोणताही प्रत्यक्ष साक्षीदार नाही. तसेच फिर्यादीने त्याचे उलटतपासात घटना प्रत्यक्ष पाहिली नाही व सनाचा अपघात कोणत्या गाडीने झाला हे त्याने स्वतः पाहिले नसल्याचे तसेच गाडीचा क्रमांक व मॉडेल हे त्याला घटनास्थळावर जमलेल्या लोकांनी सांगितला होता असे मान्य केले आहे. तसेच घटनेला कोणताही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नसल्याने व फिर्यादीच्या साक्षीवरुन आरोपीने गुन्हा केला हे सिध्द होत नाही. महत्वाचे म्हणजे या प्रकरणात घटनास्थळ पंच, जप्ती पंच, तपासी अधिकारी व इतर प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांची साक्ष

नोंदवली नाही त्यांना वेळोवळी संमन्स लागुनही ते पुराव्याकामी हजर झाले नाही. त्यामुळे पंचनामा देखील सिध्द होऊ शकला नाही. तसेच वैद्यकीय अधिकारी यांची देखील साक्ष या प्रकरणात नोंदवली नाही, त्यामुळे मरणोत्तर पंचनामा सिध्द होऊ शकला नाही. सदर प्रकरणात आरोपीने त्याच्या ताब्यातील उपरोक्त नमुद वाहन हे भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवले व त्यात फिर्यादीची बहिण हिचे मरणास कारणीभुत ठरला ही बाब सिध्द झाली नाही. तसेच फिर्यादीने गुन्हा घडतांना पाहिले नाही व तसा कोणताही प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचा साक्षीपुरावा आरोपीविरुद्ध लावण्यात आलेले आरोप सिध्द करण्याकरिता अभिलेखावर आला नाही. त्यामुळे आरोपीच्या चुकीने अपघात झाला होता याबाबत कोणताही सबळ पुरावा प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचा पुराव्यावरुन अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे अपघात हा आरोपीच्या चुकीने व त्याचे भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने वाहन चालवल्याने झाला होता ही महत्वाची बाब सिध्द होऊ शकली नाही. अभियोगपक्षाला पुरेसी संधी देवुन देखील अभियोगपक्षाने जप्ती पंच, तपासी अधिकारी व वैद्यकीय अधिकारी तसेच इतर साक्षीदारांना उपस्थित करण्यास असमर्थ ठरला. अभियोग पक्षाने तपासलेल्या साक्षीदारांनी घटनेच्या वेळी आरोपीने त्याच्या ताब्यातील उपरोक्त नमुद वाहन हे भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवित होता ही बाब वाजवी संशयाच्या पलीकडे सिध्द केली नाही. आरोपीच्याच वाहनाने अपघात झाला ही बाब अभियोग पक्षाने वाजवी संशयापलीकडे सिध्द केली नाही. आरोपीला सदरील गाडी चालविताना पाहिले असल्याबाबतचा व तो त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवित होता व त्याने सदरचा अपघात घडवून आणला व त्यामुळे फिर्यादीची बहिण ही मयत झाली ही बाब अभियोग पक्षाने वाजवी संशयापलीकडे सिध्द केली नाही.

**११.** एकदंरीत अभिलेखावर अभियोग पक्षाने आणलेल्या साक्षीपुराव्यावरुन आरोपी त्याच्या ताब्यातील उपरोक्त नमुद वाहन चालवित होता व त्याने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन अपघात घडवुन आणला ही बाब वाजवी संशयापलीकडे सिध्द केली नाही. अभियोग पक्ष हे सिध्द करु शकला नाही की आरोपी सार्वजनिक ठिकाणी भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने त्याच्या ताब्यातील वाहन चालवले व अपघात घडुन आणला. आरोपीविरुध्द ठेवण्यात आलेला कोणताही गुन्हा अभियोग पक्ष वाजवी संशयापलीकडे सिध्द करु न शकल्यामुळे संशयाचा फायदा आरोपीला देवुन मी विचाराधिन प्रश्न क्र.१ ते ५ चे उत्तर नकारार्थी देत आहे. विचाराधिन प्रश्न क्र.१ ते ५ च्या नकारार्थी उत्तराच्या अनुषंगाने मी विचाराधिन प्रश्न क्र.६ च्या उत्तराकरीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | आरोपी **परेश हिरामण आहीरे** याची भारतीय दंड विधान,१८६० चे कलम २७९, ३०४ (अ), ३३८ व मोटार वाहन कायदा कलम १८४ व १३४ (ब) १७७ अन्वये अपराधातून फौजदारी प्रक्रीया संहितेच्या कलम २५५(१) च्या तरतुदी नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे व त्याला मोकळे सोडण्यात येते. |
| २. | आरोपीचे बंधपत्र रद्द करण्यात येत आहे. |
| ३. | आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम ४३७(अ) च्या पुर्ततेसाठी रक्कम रुपये १०,०००/– चे बंधपत्र व जामीन द्यावा व त्यास फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम ४३७(अ) नुसार आजपासुन सहा महिन्यानंतर रद्द समजण्यात यावे. |

| | |
|---|---|
| ४. | खटल्यात जप्त मुद्देमाल गाडी मुळ मालकास परत करण्याव यावी व त्या करीता घेतलेले बंधपत्र अपीलाचा कालावधी पर्यंत कायम करण्यात यावे. |
| | **(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)** |

Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2026.03.27 20:08:54 +0530

**(एस.एस.छल्लाणी)**
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी
(न्या.क्र.०१), चांदवड.

दिनांक :-२७/०३/२०२६

Note:- Steno is not available.

न्या.दं.प्र.श्रे.